# ठुमरीच्या विकासातील महत्त्वाचा दुवा : उस्ताद वाजिदअली शाह

**डॉ.विनोद ठाकुरदेसाई**
संगीत व नाट्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. ९३२५६०२०१६
vinod_thakurdesai@rediffmail.com

---

**प्रस्तावना :-** ठुमरीचा उल्लेख हा अनेक प्राचीन ग्रंथांत आढळतो. १७ व्या शतकाच्या अखेरचा काळ हा ठुमरीच्या उत्पत्तीचा काळ मानला जातो. १७ व्या शतकात भारतामध्ये दिल्ली हे मुघल साम्राज्याचे विशाल आणि प्रगतीशील राजधानीचे ठिकाण शास्त्रीय संगीताच्या दृष्टीने केंद्रस्थानी होते. या राज्यामधील उच्चभ्रू मुस्लीम समाज, उमराव व नवाब मंडळी, नृत्यांगना, गायक यांच्या कलेवर फिदा होऊन त्यांना आश्रय देत असत. मात्र औरंगजेब बादशहाच्या उदार दृष्टीमुळे आर्थिक नियोजनाचा बोजवारा उडाला. राज्याच्या विकासाकडे दुर्लक्ष झाले. चुकीच्या नियोजनामुळे सरदार मंडळी आपली संपत्ती, जहागिरी आपल्या वारसांना हस्तांतरित करू शकले नाहीत. त्यांचा खर्च मशिदी, थडगी बांधण्यावर, नृत्य, गायन यांच्या जलशांवर होऊ लागला.

औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर इ.स.१७०७ मध्ये व १८ व्या शतकाच्या मध्यावर दिल्लीची सामाजिक व आर्थिक स्थिती खालावू लागली व त्याचा सांस्कृतिक जीवनावर परिणाम होऊ लागला. दिल्लीची हळूहळू शकले होऊ लागली. जाट, मराठे, अफगाण व शीख यांनी बंडाळी करून आपले स्वतंत्र सुभे निर्माण केले. त्याचा सांगीतिक जीवनावरही परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. दिल्लीची ही अशी अवस्था असताना दिल्लीच्या दक्षिण पूर्वेला असलेले लखनौ हे शहर राजकीय व सांस्कृतिकदृष्ट्या उत्तरेकडील प्रमुख शहर म्हणून नावारूपास येत होते. सादत खान (इ.स. १७२५) आणि सफदरजंग (इ.स.१७५४) या दोन सुभेदारांनी 'अवध' (अयोध्या) या राज्याची राजधानी म्हणून लखनौला महत्त्व प्राप्त करून दिले. आर्थिक व सामाजिक सुधारणांमुळे लखनौची भरभराट झाली. श्रीमंत, उच्चभ्रू, सुभेदार, नवाब, जमीनदार यांचे विलासी जीवन व शौक वाढू लागला. गणिका, कलावंतिणी, कलाकार, संगीतकार ही मंडळी लखनौमध्ये येऊन स्थिर झाली व त्यांना राजाश्रय मिळाला. दिल्लीहून हजारो कलावंतिणी, गणिका, गायक-वादक, कलाकार लखनौमध्ये येऊन स्थायिक झाले.

दुसरा महत्त्वाचा भाग असा की, लखनौ हे ब्रज या बोलीभाषेच्या प्रांताजवळ व प्रभावाखाली असल्याने त्या भाषेच्या प्रभावातून व ब्रज लोकगीतातून ठुमरीचा जन्म झाला असे मानतात. परंतु ठुमरीला राजाश्रय खऱ्या अर्थाने मिळाला तो उस्ताद वाजिदअली शाह यांच्या शासन काळात. नवाब वाजिदअली शाह हे अयोध्येचे नवाब होते. त्यांचा जन्म ३० जुलै, १८२२ मध्ये लखनौ येथे झाला. ते १८४७ मध्ये म्हणजे वयाच्या २५ व्या वर्षी अयोध्येच्या गादीवर बसले आणि त्यांना फेब्रुवारी १८५६ मध्ये इंग्रजांनी राजगादीवरून हटवले. त्यामुळे १३ मार्च, १८५६ ला त्यांना लखनौ सोडावे लागले. या अगदी नऊ वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत वाजिदअली शाह यांनी लखनौमध्ये ठुमरीला मोठा राजाश्रय व प्रोत्साहन दिले. त्यांचा हा राजकीय काल हा राजकारणापेक्षा ललितकलांच्या उर्जितावस्थेच्या दृष्टीने अत्यंत सुवर्णकाळ होता.

उस्ताद वाजिदअली शाह हे कुशल संगीतज्ज्ञ, गायक, कवी, रचनाकार होते. महंमद करम इमाम यांच्या मतानुसार त्यांचा ललितकलांमधील प्रत्येक क्षेत्रावर उत्तम अधिकार होता. राजकारणापेक्षा बादशहाचे संगीत नृत्यादि कलांकडे अधिक लक्ष होते. उर्दू शेरोशायरी, संगीत, नाट्य, कथ्थक, नृत्य तसेच ठुमरी या क्षेत्रांत त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. 'अख्तर', 'अख्तरपिया' तसेच 'आलम' या उपनावांनी उस्ताद वाजिदअली शाह यांनी अनेक ठुमऱ्यांची व ग्रंथांची रचना केली. त्यांनी जवळ जवळ शंभर ग्रंथांची निर्मिती केली. आज त्यातील फक्त चाळीस ग्रंथ उपलब्ध आहेत. संगीत क्षेत्राच्या दृष्टीने 'बनी', 'दुल्हन', 'नाजो' तसेच 'सौतुल-मुबारिक' हे त्यांचे महत्त्वपूर्ण ग्रंथ आहेत.

'नाजो' या ग्रंथात अख्तरपिया यांनी आपल्या तसेच, इतर प्रसिद्ध गायक-कवींच्या राग-रागिण्यांवर आधारित भरपूर गीतरचना दिल्या आहेत. त्यात त्यांनी स्तुती, धृवपद, सादरा, दादरा, ताल, सरगम, चतुरंग, होरी, ख्याल, तराना, सिन्धीगीत, ठुमरी, चाचर तसेच दोहऱ्या संबंधातील गीतरचना असे एकूण १५ भाग विभागले आहेत. उस्ताद वाजिदअली शाह यांची भारतीय संगीताप्रती भरपूर निष्ठा होती. भारतीय संगीतासंदर्भात ते लिहितात -

**सुरों की उपज हो तरन्नुम के साथ**

**हिंले होंठ मुतरिब के कुमकुम के साथ**
**खराज का वकार और सुरों की लकीर**
**वो तानें की जिनसे पडे दिल पे तीर ।।**

'नाजो' मध्ये हिंदी (खडी बोली), उर्दू, ब्रज, मारवाडी, पंजाब, बंगाली इत्यादी अनेक भाषांतील रचना आहेत. यात तानसेन, बैजू, गोपाल नायक तसेच इतर अनेक संगीत तज्ज्ञांच्या रचना दिल्या आहेत. अवधमध्ये गायिले जाणारे सावन, फाग, धमार, होली, भजन, मनकबत, बन्नी, बन्ने, नकरे, गालियाँ इत्यादी गीतांचा समावेश 'नाजो' या ग्रंथात आहे. थोडक्यात यातील अनेक लोकगीते व इतर संगीत तज्ज्ञांच्या रचना ह्या ठुमरीच्या विकासात योगदानच ठरल्या.

'अख्तरपिया' नावाने नवाबांनी भरपूर ठुमऱ्यांची रचना केलेली दिसून येते.

उदा. १) ब्रज भाषेतील ही काफी रागातील अध्धा तालातील रचना आहे.

**स्थायी : मोरी आली मै पनियाँ कैसे लाऊँ री**
**सखी री नागर नटखट मुकुटवारी**
**मोसे करत धिठाई, बंसी बट जमुना**
**तट, पनियाँ कैसे लाऊँ री**
**अंतरा : उझक उझकक और उचक उचक**
**झांकेरी अख्तर**
**तन पनघट बंसीवर जमुना तट,**
**पनियाँ कैसे लाऊँ री**

उदा. २) ही भैरवी रागातील अतिशय प्रसिद्ध अशी रचना ताल दीपचंदीमध्ये केलेली आहे.

**स्थायी : बाबुल मोरा नैहर छुटो ही जाय**
**अंतरा : चाल कहर मिल मोरी डुलिया सजाय लाये**
**अंगना तो पर्वत भयो और देहरी भई विदेस**
**ले बाबुल घर अपना, मै चली पिया के देस**
**मोरा अपना बेगाना छुटो जाय**

उदा. ३) **स्थायी : चमक चमक चमके बिजरीया**
**कैसे के जाऊँ पिया तोरी सजरिया**
. **अंतरा : बादर गरजे जियरा लरजे**
**अख्तरपिया संग भेजो खबरिया**

उदा. ४) **स्थायी : तडप तडप सगरी रैन गुजरी**
**कौन देस गये साँवरियाँ**
**अंतरा : अरज करे सपने में अख्तर**
**बसू तुम्हारे पायरिया**

या रचनांशिवाय 'जुगलकिशोर बाँसुरी बजावत', 'सुधा बिसर गयी अपने गुनन की' (राग-खमाज), 'फुलवाले कंस मैका बसंत गंडुवा मोल दे रे' (राग-बिहाग) अशा 'अख्तरपिया' या नावाने रचित नवाब वाजिदअली शाह यांच्या अनेक रचना प्रसिद्ध आहेत. याशिवाय त्यांनी 'मोहनरसिया' व 'शाम' या नावांनीही रचना केलेल्या दिसून येतात.

उदा. **१) मोहन रसिया आये बगिचा में**
**२) शामबिन सजनी पिया ना धरो मोरा धीर**

लखनौ आणि संगीताचा संबंध हा आसफ उदौलाच्या काळापासून मानला जातो. आसफद्दौला स्वत: संगीतप्रेमी असल्यामुळे फैजाबादेहून संगीताची कित्येक प्रसिद्ध घराणी लखनौमध्ये येऊन वसली असे इतिहास सांगतो. ह्या संगीत तज्ज्ञांत मियाँ

जानी, गुलाम रसूल, शक्कर-मख्खन वगैरे कव्वाल ज्याप्रमाणे होते, त्याचप्रमाणे टप्पा गायकीचे जनक शौरीमियाँ, छज्जू खाँ व जीवन खाँ, नवाब कासीमअली खाँ वगैरे कितीतरी प्रसिद्ध गायक होते. यापैकी बहुतेकांनी सादतअली खाँ यांच्या आमदानीत लखनौ शहर कायमचे सोडले आणि आपली घराणी दुसऱ्या शहरांच्या नावावर चालविली. कारण सादतअली खाँ याला संगीत व इतर कुठल्याही कलेमध्ये रूची नव्हती. परंतु ही परिस्थिती उस्ताद वाजिदअली शाह यांच्या शासन काळामध्ये बदललेली दिसते.

उस्ताद वाजिदअलींच्या शासनकाळात अत्यंत विलासपूर्ण असे वातावरण होते. त्यामुळे राजकीय अध:पतन झाले, परंतु स्वत: नवाबाच्या प्रोत्साहनामुळे, आश्रयामुळे अनेक गायक पुढे आले. अनेक घराणी, शैलींचे नाव झाले. कलांनी उन्नती केली. त्यांच्या आमदनीत लखनौचे कथ्थक घराणे, ठुमरी गायकी तसेच मसीतखानी व रजाखानी गत यांचा विकास झाला. नज्मअल् घनी खान या इतिहासकारांच्या मते नवाब वाजिदअली शाह यांनी सादिकअली खान यासारख्या प्रसिद्ध ठुमरी गायकांना राजाश्रय तर दिलाच, पण त्याचबरोबर २६ सारंगीये आणि १३ तबलीये यांनाही दरबारात ठेवून घेतले. दरबारात असलेल्या २१६ गणिकांना त्यांनी संगीत व नृत्याचे शिक्षण दिले होते व त्यांच्या सहवासात ते रमत असत. झुमर आणि तमाशा या लोककलांमधील तत्कालीन कलाकारांनादेखील त्यांनी आश्रय दिला होता. त्यामुळे १८ व्या शतकाच्या शेवटच्या भागामध्ये ठुमरी आणि कथ्थक नृत्य यांबाबत लखनौवासियांमध्ये रूची वाढली. बादशहाच्या प्रोत्साहनामुळे अंत:पुरापासून राजदरबारापर्यंतच्या मैफलींमध्ये कथ्थक नृत्य आणि ठुमरी गायनाने धूम माजविली. ठुमरीचा प्रसार व प्रचार झाला. यापासून प्रेरित होऊन अनेक संगीत तज्ज्ञांनी सुद्दया ठुमरी गायनास प्रारंभ केला.

नवाब वाजिदअली शाह यांच्या 'बनी' या ग्रंथानुसार त्यांच्या पदरी असलेल्या अनेक संगीत तज्ज्ञांकडून बादशहाच्या बेगमांना संगीताचे नियमितपणे शिक्षण दिले जात असे. संगीत व नाट्यप्रयोगासाठी बादशहांनी आपल्या अंत:पुरात 'परिखाना' नावाची स्त्रियांची एक मंडळी तयार केली होती. त्यात अनेक उत्तम गायिका व नर्तकी होत्या. त्यापैकी काहींची उपजीविका संगीतावरच चालत असे. परिखान्यातील या गायिकांना आणि नर्तकींना गाणे, नृत्याभिनय शिकविण्यासाठी राजदरबारातील अनेक संगीत तज्ज्ञ आणि कथ्थक नर्तक नेमले गेले होते. त्यांच्या सहाय्याने संगीत प्रधान नृत्य नाट्यांचे प्रयोग केले जात असत. स्वत: वाजिदअली शाह यांनी 'रहस' आणि 'इंद्रसभा' ही दोन संगीतप्रधान नृत्य-नाट्ये लिहिली. अब्दुल हलीम शाह यांनी आपल्या 'गुजिश्ता लखनौ' (पुराना लखनौ) या ग्रंथात असे म्हटले आहे की, 'रहस' ही विशेषत: ब्रज-मथुरा येथील कला आहे. तेथील रासधारींनीच लखनौ येथे येऊन लखनौला त्याची चटक लावली. वाजिदअली शाह ना जेव्हा हे 'रहस' आवडले तेव्हा त्यांनी आपल्या रूचीप्रमाणे काल्पनिक प्लॉटचे 'रहस' तयार केले. 'इंद्रसभा' मधील संवाद उर्दू असले तरी ठुमरी व होरी हे प्रकार मुख्यत: ब्रजभाषेतच आहेत. 'रहस' आणि 'इंद्रसभा' ही शृंगारात्मक व नृत्यप्रधान संगीत नाटके असून गोपी किंवा परी (अप्सरा) या स्त्रीपात्रांची गाणी व नृत्याभिनय यासाठी ठुमऱ्या आणि होली (चाचर गीत) यांचा उपयोग केला आहे.

नवाब वाजिदअली शाह यांनी नृत्याचे शिक्षण आपल्याच दरबारातील कथ्थक नर्तक ठाकुरप्रसाद आणि त्यांचे बंधू दुर्गाप्रसाद यांच्याकडून घेतले होते. त्यांचे ताल व लयीवर एवढे प्रभुत्व होते की, निसारअली पखवाजी यांनी त्यांना तीन वर्षाच्या कालावधीत धिम्या त्रितालाच्या बावन्न प्रकारच्या लयी शिकविल्या होत्या. याशिवाय बादशहांनी अनेक गायक-वादक आणि नर्तक यांचे शिष्यत्व पत्करले होते. त्यांनी शास्त्रीय गायनाचे शिक्षण सेनी या घराण्याचे उस्ताद बसत खाँ, प्यारा खाँ आणि जफर खाँ यांच्याकडून घेतले होते. स्वत: नवाब वाजिदअली शाह यांनी अनेक गायकांना गायनाचे शिक्षण दिले होते. उदा. गुलाम हुसेन खाँ, मीर खाँ, अली बख्श याशिवाय काही नर्तकही तयार केले. उदा. कायन खाँ, कलंदर बख्श. अनेक नर्तकींना त्यांनी धृपद, ख्याल, चतरंग, त्रिवट, होरी, धमार, तराना, ठुमरी आणि गझल हे संगीत प्रकार व तेवरा, रुपक, चौताल, ब्रह्मताल, लक्ष्मीताल, सुलफाक ताल, छबी ताल त्याचबरोबर त्रिताल, अध्धा, चाचर या तालांतील रचना शिकविल्या.

नवाबाच्या शासनकाळातील एक कलाकार म्हणजे त्यांच्या दरबारातील उस्ताद सादिकअली खाँ हे होत. उस्ताद सादिकअली खाँ हे कव्वालबच्चे घराण्यातील अभिजात संगीतातील गायक होते. तसेच ते 'लखनौ ठुमरी' चे जन्मदाते किंवा प्रवर्तक होते. बैठकीत ठुमरी गाण्याचा प्रघात त्यांनी सुरू केला असे मानतात. कारण तोपर्यंत ठुमरी हा गीत प्रकार नृत्याशी संबंधित होता. उस्ताद सादिकअलींचा जन्म इ.स. १८०० मध्ये व मृत्यू इ.स. १९१० मध्ये झाला. जवळ जवळ ११० वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य त्यांना लाभले होते. त्यांच्या प्रमुख शिष्यांमध्ये उस्ताद अलीबख्श खाँ यांचे सुपुत्र कुर्शेदअली खाँ, इनायत हुसेन खाँ (सेहसवान), महाराज

बिंदादीन, भैय्या गणपतराव, मौजुद्दीन खाँसाहेब तसेच पंडित रामकृष्णबुवा वझे यांचा समावेश होतो. त्यांच्या महिला शिष्यांमध्ये दैदरजान व नजमा या प्रमुख शिष्यांचा समावेश होतो. असे म्हणतात की, वाजिदअली शाह आणि नवाब मिर्जाबाला कदर उर्फ 'कदरपियाँ' यांनी सुद्धा उस्ताद सादिकअली खाँ यांच्याकडून ठुमरीचे शिक्षण घेतले होते.

१८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामाच्या दरम्यान लखनौचे सांस्कृतिक केंद्र म्हणून असलेले महत्त्व कमी झाले. या दरम्यान झालेल्या युद्धामध्ये लखनौ उद्धवस्त झाले आणि संगीताला राजाश्रय देणारी अनेक सधन मुस्लीम घराणी नाश पावली. खुद्द नवाब वाजिदअली शाह यांना ब्रिटीशांनी हद्दपार केले आणि मटियाबुर्ज येथे स्थानबद्ध केले. त्यांच्याबरोबर सादिकअलींसारखे १०८ दर्दी कलाकार आणि संगीत तज्ज्ञ लखनौ सोडून कलकत्त्यातील या उपनगरामध्ये स्थायिक झाले. त्यामध्ये नखनौ दरबारातील उस्ताद ताज खाँ, उस्ताद अलीमख्श खाँ आणि उस्ताद सादिक अली खाँ इत्यादी संगीत तज्ज्ञ उस्ताद वाजिदअली शाह यांचाही समावेश होता. तथापि काही काळानंतर उस्ताद सादिकअली खाँ पुन्हा लखनौला परत आले. परंतु नंतर सुद्धा ते कलकत्त्याला येत-जात राहिल्याने मध्यवर्ती स्थनांमधील संगीत रसिकांना ठुमरी गायनाची ओळख झाली. त्यामुळे पूर्व भारतातील बनारस, गया, पटना व कलकत्ता इत्यादी स्थानांमधील लोकांना सुद्धा ठुमरी गायनात रुची निर्माण झाली.

अशा प्रकारे उस्ताद वाजिदअली शाह यांचे ठुमरी विकासामध्ये अतिशय महत्त्वाचे योगदान आहे. असद् अल्ला कोकब हा तत्कालीन लेखक असे म्हणतो की, 'वाजिदअली हा स्वत: एक जाणकार आणि गुणी कलाकार होता हे जरी खरे असले तरी, सवंग लोकप्रियतेच्या नादी लागून साचेबंद, हलक्या व छचोर रचनांना त्याने उत्तेजन दिले. त्यामुळे त्या काळच्या लोकप्रिय गझल व ठुमऱ्यांच्या बंदिशी या धृपद व होरीप्रमाणे समृद्धपणे बांधल्या गेल्या नाहीत व या बंदिशींसाठी आकर्षक, हलक्या-फुलक्या अशा खमाज, भैरवी, झिंजोटी, तिलक आणि पिलू अशाच रागांचा वापर राहिला व वजनदार रागांतील बंदिशी बाजूला पडल्या. बादशहाचे मनोरंजन करणे व लखनौमधील रसिकांना भुरळ पाडणे एवढेच मर्यादित उद्दिष्ट ठेवण्याचा तो दुष्परिणाम होता.'

ठुमरीचा विकास आणि प्रचार लखनौ हे केंद्र मानून झाला. विविध भागातील वेश्या, ठुमरीची आवड असणारे गायक-गायिका लखनौमधील गुणीजनांकडून ठुमरी शिकण्यात गौरव मानत. लखनौमधील ठुमरी रचनाकार व संगीत तज्ज्ञ यांच्या गायनाच्या एका विशिष्ट शैलीमुळे ठुमरीचे एक विशिष्ट स्वरूप विकसित होऊन तत्कालीन संगीत रसिकांत लोकप्रिय व प्रचलित झाले. या ठुमरीच्या काव्यावर ब्रज भाषेबरोबरच लखनौची क्षेत्री बोली अवधी व उर्दू तसेच नवाबी युगाची विलासी वृत्ती यांचा प्रभाव होता. कालांतराने या विशिष्ट स्वरूपाला 'लखनवी ठुमरी' असे म्हटले जाऊ लागले. पुढे सादिकअलींमुळे बंगालमध्ये 'पूरब अंगा' च्या ठुमरीची मूळ घट्ट झाली. यामध्ये अर्थात ग्वाल्हेरचे भैय्या गणपतराव, गोहरजान, पंडित दरगाह मिश्र यांची शिष्या जद्दनबाई, मलकाजान (आग्रेवाली), बाबू शामलाल खत्री, संगीताचार्य गिरीजाशंकर चक्रवर्ती, उस्ताद मौजुद्दिन खाँ तसेच गयाचे गफूर खाँ यांचेही योगदान फार मोलाचे आहे. उस्ताद वाजिदअली शाह हे स्वत: उत्तम कलाकार असल्यामुळे उपशास्त्रीय संगीत व कथ्थक नृत्य यांना जनमानसात लोकप्रियता मिळवून दिली. तसेच अयोध्येचे नवाब असल्यामुळे अनेक कलाकारांना आश्रय दिला. लखनौ हे ठुमरीचे केंद्र बनविण्यामध्ये तसेच ठुमरी गायनाला राजाश्रय व प्रतिष्ठा मिळवून देण्यामध्येही उस्ताद वाजिदअलींचे मोठे योगदान आहे यात शंकाच नाही.

**संदर्भ ग्रंथ 1** डॉ राजेन्द्र शर्मा, बाल-विकास एवं मनोविज्ञान, प्रथम संस्करण-1998, प्रकाशक- सवलाइम पब्लिकेशन्स, जयपुर ।
2 पंडित विष्णु नारायण भातखंडे, हिन्दुस्तानी संगीत पद्धति क्रमिक पुस्तक मालिका, अप्रैल 1978, प्रकाशक- एल एन गर्ग, संगीत कार्यालय, हाथरस
3 सौ लीना कांडलकर, मानव विकास, जुलाई 2000, प्रकाशक क्रमांक 435, प्रकाशक-श्री प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन, नागपूर
4 श्रीपाद रामचन्द्र नाईक, सांगीतिक मानस-शास्त्र आणि आधुनिक-संगीत-शिक्षण पद्धति संगीत कला विहार, अगस्त 1958, वर्ष-11, अंक-8
5 श्रीपाद रामचन्द्र नाईक, सांगीतिक मानस-शास्त्र आणि आधुनिक-संगीत-शिक्षण पद्धति संगीत कला विहार, सितम्बर 1958, वर्ष-11, अंक-9